# यात्रा

लेखन - मुक्ता बाम

---

"चल काशी, रेडी हो जा!" काजल मौसीनं फर्मान सोडलं.
काशीने खिडकीतून बाहेर पाहिलं. अंधार पडू लागला तशी बुधवारपेठ अजूनच गजबजून गेली होती. विविध रंगाची, वासाची, हपापलेली माणसं पहायची काशीला आता सवय झाली होती. तरीही आज तिचं हृदय धडधडायला लागलं होतं. काजल मौसीला आपल्या मनातलं काही कळलं तर नसेल ह्या भितीने तिने हळूच मौसीकडे पाहिलं. पण तसं काहीच चिन्ह दिसत नव्हतं.
काजल मौसी नेहमीप्रमाणे मळक्या गाऊनमधे खूर्चीवर फतकल मारून बसलेली होती. ती रोज सलमानखानचा कोणता ना कोणता सिनेमा टि.व्ही.वर मन लावून बघत बसायची. पण म्हणून तिचं धंद्यावरचं लक्ष कधी हलायचं नाही, कोण गिऱ्हाईक कधी येतं, किती पैसे देतं हे तिच्या नजरेतून सुटायचं नाही. इथं पहिल्यांदा आली तेव्हा काशी काजल मौसीचा तिरस्कार करायची. तिचं पान खाणं, कुठेही थुंकणं, दारू पिणं, पदर न सावरता कसंही बसणं ह्याची काशीला किळस यायची. पण काशी हळूहळू इथं रुळली तशी तिला मौसीच्या वागण्याची सवय होऊन गेली.
मजेत असली की मौसी रंगवून रंगवून स्वतःची गोष्ट सांगायची, ती म्हणे पिक्चरमधे काम करायला घरातून पळाली. मुंबईला स्टुडिओंमधे वणवण फिरत राहिली, कोणीतरी तिला फसवली आणि इथं आणून सोडली. तिला म्हणे तिथे एकदा सलमानखान दिसला होता.
"पर मौसी, तुमको देखा क्या उसने?" कोणीतरी चोंबडेपणा करत खिदळायचं.
" हा! देखतेही रह गया था मेरे को। इसिलिए तो उस दिन से आज तक कुंवारा है!" मौसी ठासून सांगायची आणि सगळ्याजणी फिदीफिदी असू लागायच्या.
काशीला आत्ताही ते आठवून हसू आलं. ते लपवत ती लगबगीने वळली आणि कपडे बदलायला निघाली.
" मौसी, इसे तयार होने की क्या जरुरत? काशीला नुसतं पाहूनही पागल व्हत्यात लोकं!" कमला हसत हसत म्हणाली.
" क्यो बेकार की बकबक करती रहती है, चल बाहर जा के खडी हो जा!" मौसी तिच्यावर डाफरली.

काशी स्वतःशीच हसत बाथरुममधे गेली. तिने हळूच आरश्यात आपलं रुप न्यहाळलं. मग हलकेच हात आपल्या पोटावर ठेवला.
"सगळं छान व्हनार आता." ती स्वतःशीच पुटपुटली. तिला अचानक तिच्या पोटावर त्याने

ठेवलेल्या हाताचा स्पर्श जाणवला. तोच म्हणाला नव्हता का, "हे मूल माझं आहे. मी तुला - ह्या बाळाला घेऊन जाईन इथून. आपण सगळे खूप सुखात राहू काशी." आत्ताही ते शब्द आठवून तिच्या अंगावर शहारा आला. तिने हळूच काजळाचं तीट आपल्या पोटाला लावलं आणि ती कपडे बदलून बाहेर आली.

तिला फार वेळ उभं रहावं लागलंच नाही. तो आलाच. त्यांनी दूरूनच एकमेकांना ओळख दिली आणि काशी लाजत त्याला आत घेऊन आली.

खोलीत जाताच तिने खूप वेळ मनाशी तयार करुन ठेवलेली वाक्यं म्हणायला सुरुवात केली.

" मनोहर, हे पाह्य, मी फार काळ काजल मौसीपासून हे नाही लपवून ठिवू शकनार. लवकरच कळंल हे समद्याईना."

"मग?"

"मग काय, तू ... तुह्या डोक्यात काही.. काय, अं, ठरवायलास तू?"

"अगं किती घाबरते आहेस. मी तुला इथून घेऊन जाणार हे नक्की. फक्त आत्ता.."

" मी अशी असल्यानं तुझं पक्कं ठरना का? हे पाह्य, मी काही इथं न्हाई जनमलेली. आई-बाबा वारकरी व्हते माह्ये, मी यात्रेत हरवल्ये. मी चांगल्या घरची पोरगी ए... आपन दुसरीकडं गेलो तर कोनाला संशयबी येनार न्हाई.." काशीने संयमाने बोलायचं ठरवलं होतं पण एकदा विषय निघाल्यावर तिला रहावेनाच. साधं आयुष्य जगण्याची शेवटची संधी होती ही. आणि मनोहर गेले दोन आठवडे यावर बोलायचं नावच घेत नव्हता. ती रोज कासावीस व्हायची पण मग मनोहर चांगला आहे, त्याचं खरच प्रेम आहे आपल्यावर अशी स्वतःची समजूत घालायची.

"काशी, एक लक्षात ठेव. मी तुझी जबाबदारी नाकारत नाहीये. मला फक्त आत्ता लगेच काही करणं अवघड आहे.." मनोहरने तिचा हात हातात घेत सांगितलं आणि काशी सुखावली.

इतक्यात दारावर ठकठक झाली. मनोहरने दचकून हात मागे घेतला आणि तो काशीपासून शक्य तितका दूर झाला.

"दार उघडा चला!" काठी दारावर आपटली. काशीने थरथरत्या हातांनी दार उघडलं. बाहेर पोलिस उभे होते. त्यांनी मनोहरला ओढून बाहेर काढलं, इतर गिऱ्हाईकांसोबत उभं केलं.

"चौकीवर चला" पोलिस डाफरले.

कमला, सरला, काशी... सगळ्यांना पकडून पोलिस घेऊन चालले होते. न्यूज चॅनेलचे कॅमेरे गोळा झाले होते. पोलिसांनी कॅमेरावाल्यांना हटकलं पण त्यापूर्वीच त्यांना हवं ते मिळालं असणार असं काशीला वाटून गेलं. आता काही मिनिटातच सगळ्यांचे चेहरे टिव्हीवर दिसू लागणार होते. एक हवालदार गिऱ्हाईकांना घेऊन मागून चालत होता. नुकत्याच घडलेल्या प्रकाराने ते सगळेच हादरले होते. पोलिस थोड्यावेळात सोडून देतील हे माहित असलेल्या बायका मात्र पुढे मजेत चालल्या होत्या. एकट्या काशीचं डोकं सुन्न झालं होतं आणि त्या अवस्थेतही मागून तिला मनोहरचा, पोलिसांना विनवण्या करणारा आवाज ऐकू येत होता.

"साहेब माझी काही चूक नाही. ती बाई मागे लागली, ओढूनच घेऊन गेली मला आत. तुम्हाला तर माहितीच आहे ह्या असल्या बायका कश्या असतात ते. मी काही करतही नव्हतो. साहेब मला यात अडकवू नका. मी चांगल्या घरातला माणूस आहे, ह्या अशा ठिकाणी फिरकतही नाही मी.."
काशीला अचानक कसंतरी होऊ लागलं. घसा दुखू लागला. जोरात ओरडावंस वाटू लागलं. पण तिच्या तोंडातून शब्दही फुटत नव्हता. ती मान खाली घालून चालत राहिली, जणू तिच्या आत कोणतं वादळ घोंगावत नव्हतच.
ते स्टेशनवर पोचले आणि सगळ्यांनी जबानी घेऊन झाली. मनोहर नजर चोरत उभा होता. काशीला वाटत होतं की त्याने एकदा तिच्याकडे पहावं, 'हे सगळं फार गंभीर नाही, काही होणार नाही' असं त्याला सांगता यावं. पण मनोहरने शेवटपर्यंत काशीकडे बघितलं नाही. दम देऊन पोलिसांनी गिऱ्हाईकांना सोडून दिलं आणि मनोहर निघून गेला. काशीला इतकं गळून गेल्यासारखं झालं की कुठल्याही क्षणी तिचा तोल गेला असता. तिने डोकं झटकलं आणि ती पायात जरा अंतर घेऊन उभी राहिली. आता कोसळून चालणार नाही हे तिला त्याक्षणीच पक्कं कळलं होतं.
थोडावेळ दमदाटी, अश्लिल विनोद करुन बायकांचे वाभाडे काढून झाले तसं पोलिसांनी बायकांना सोडून दिलं. अर्थात मौसीने ह्यासाठीच गलेलठ्ठ पगार देऊन एक वकील ठेवला होता. तो वकील बरोबर बायकांना सोडवत असे. अर्थात बंद दाराआड त्याचं पोलिसांशी नक्की काय बोलणं व्हायचं कोणालाच कळायचं नाही. पण मौसीच्या बायका बरोबर परत मौसीच्या कोठीवर यायच्या.
मध्यरात्र उलटून गेल्यावर सगळ्या बायका परत कोठीकडे निघाल्या. सगळ्या मोठमोठ्या आवाजात आजच्या घटनेवर चर्चा करत होत्या. काशी मात्र गप्प गप्पच होती. मनोहर पोलिसांच्या कचाट्यातून सुटण्यासाठी केवळ असं बोलला असेल आणि नंतर तो हे आपल्याला पटवून द्यायला येईल हे तिला माहिती होतं. पण का कुणास ठाऊक, ह्यावेळी ते आपल्याला पटेल असं तिला वाटेना.
काहीतरी चुकत होतं. काशीची खात्री होती. दुर्दैवाने दुसऱ्या दिवशीच तिला पुरावा मिळाला. सकाळी काशी उठली. आज पहिल्यांदाच बाथरुमबाहेर रांगा नव्हत्या. सगळ्याजणी मौसीच्या खुर्चीपाशी जमा झाल्या होत्या. टिव्ही पहात कुजबूजत होत्या. विस्कटलेल्या केसांचा अंबाडा घालत काशीही त्यांच्यात मिसळली. काशी जवळ आल्याचं कळताच बायका गप्प झाल्या. काशी प्रश्नार्थक नजरेने कमलाकडे पाहू लागली. कमलाने आवंढा गिळला आणि परत टिव्हीकडे इशारा केला.
" काल बुधवार पेठेत पडलेल्या छाप्यात पकडल्या गेलेल्या एका गिऱ्हाईकाने आत्महत्या केल्याचं नुकतंच समोर आलं आहे. आपली बदनामी झाल्याने आता जगण्याला अर्थ नाही असा खुलासा त्याने मृत्यूपूर्वी लिहिलेल्या पत्रात केला आहे. मनोहर देशमुख असं मृत तरुणाचं नाव असून पोलिसांनी त्याची कोणत्याही प्रकारे बदनामी झाली नसल्याचं...."

काशीला काहीच ऐकू येईनासं झालं. ती मटकन् खाली बसली. तिच्या डोळ्यापुढे तिचे आई-आबा आले. सगळे मोठ्या उत्साहात यात्रेला निघाले होते. मजल दरमजल करत पुण्यात पोचलेसुद्धा. आबा तिला दगडूशेठच्या दर्शनाला घेऊन आले. त्या प्रचंड गर्दीत कोणीतरी हिसका देऊन तिला ओढलं आणि काही कळायच्या आत ती आबांपासून दूर दूर ओढली गेली. मग ह्या मौसीच्या कोठीवरच लहानची मोठी झाली. आई-आबांनंतर पहिल्यांदा तिच्यावर जीव मनोहरने लावला. 'आपण कोणीतरी खास आहोत' हे समोरच्याच्या डोळ्यात दिसणं काय असतं हे विसरुनच गेली होती ती. मनोहरने परत तिच्यातली नात्यांची ओढ जागी केली. काशी परत आनंदी दिसू लागली. त्याचं बाळ आपल्या पोटात आहे हे कळल्याच्या दिवशी तर हरखून गेली होती ती. पण तो मनोहरही आता तिच्यापासून दूर गेला होता. किंवा यातलं कोणी कधी तिच्या जवळचं नव्हतंच. तिनेच उगाच यांच्यावर जीव ओवाळून टाकला होता. दर्शनाच्या त्या प्रचंड गर्दीतून तिला बाहेर ओढायला ना आबांचा हात पुढे आला, ना या स्थितीत तिची जबाबदारी उचलायला मनोहरनं हात पुढं केला. हे एकटेपण काशीच्या अंगावर आलं. एवढी वचनं देऊनही जबाबदारी न निभावणाऱ्या मनोहरबद्दल तिच्या डोक्यात प्रचंड राग उफाळून आला. म्हणजे शेवटी ह्याचं फक्त मनोरंजन करायला आपण हव्या होतो का ह्याला? शेवटी ह्याला आपली लाजच वाटली. बरं, इतका भेकड निघाला की आत्महत्या केली ह्याने! ह्या... ह्या अश्या माणसाचा अंश आपण जपायचा? शक्यच नाही... डोळ्यांतून कधी पाणी वाहू लागलं तिला कळलंही नाही.

" कमला... त्याचं बाळ.." काशी कशीबशी पुटपुटली आणि कमलाला मिठी मारून रडू लागली.

कितीतरी वेळाने तिला जाग आली. तिला कोणीतरी पलंगावर झोपवलं होतं. हळूहळू तिला घडलेल्या घटना आठवू लागल्या आणि ती ताडकन् उठली. खोलीच्या बाहेर आली. दुपार होत आली होती. बाहेर मौसी कठड्यावर बसून दारू पीत होती.

" ए काशी... कमला बोली.. तू तो मा होनेवाली है!" काजल मौसी आपल्याच धुंदीत बडबडली.

" हाँ. वाट सोड मौसी मी बाह्येर चालले."

"लडका है या लडकी?"

" ठाव नाही."

"अरे बता तो, तुझे क्या लगता है?"

" म-मनोहर म्हनायचा मुलगी आ..आहे.." काशीला स्वतःचंच नवल वाटलं. इतका संताप मनात असूनही आत्ता मनोहर आठवला, त्याचं नाव घेताना छान वाटलं... काय झालंय आपल्याला?

" अरे फिर तो अच्छी बात है! लडकी तो मौसी की कोठी पे काम आयेगी.. क्या?"

मौसीचं ते विचित्र हसणं, तिच्या हातात हलणारी ती दारूची बाटली, त्यात हिंदकळणारी

दारू.... काशीला सगळं असह्य झालं. तिचा स्वतःवरचा ताबाच सुटला.
" मौसी! सून! नही देनी मुझे मेरी बच्ची तुझे। मै मेरी बच्ची किसी को नही दूंगी।"
" अरे ऐसे कैसे नही देगी? तू तो अब नही जा सकती यहा से... तेरी बच्ची यही तो रहेगी। अपनी मौसीसे धंदा सिखेगी.." काजल मौसी हसत झोकांड्या खाऊ लागली होती.
" माह्यं बाळ कोनालाच भेटनार नाही मौसी. ध्यानात ठेव."
" तो क्या करेगी? गिरायेगी बच्चा? जो चाहे कर... तू नही निकल सकती उस मनोहर की यादोंसे, तू नही छोड सकती अब ये धंदा.. बाहर कोई नही है तेरे लिए, हम जैसों का कोई नही है.."
" मला कोनी मानूस नकोय.. मला -" काशी अडखळली. काय हवं होतं तिला?
" क्या चाहिये तेरे को?"
" आझादी.." काशीचा आवाज अचानक खूप ठाम झाला. आतलं काहीतरी मोकळं झाल्यासारखं वाटलं तिला.  मौसी हसू लागली.
" यही तो आझादी है! बच्चा गिराके आझाद नही हो पाएगी तू, फंस जाएगी उसके गम में! सून काशी..  मै जादा दिन नही रहेगी, अब आगे सब तुझेही संभालना है.. तू अक्का बनेगी यहा की। तेरी आझादी यहां ही है.."
मौसी काशीला वेड लागल्यासारखी हसली. काशीने मौसीला दूर ढकललं आणि ती कोठीच्या पायऱ्या उतरु लागली. तिने मागे वळून पाहिलं, मौसी चढत वरच्या मजल्यावर चालली होती.  एक क्षण तिला वाटलं की कोणालातरी मौसीवर लक्ष ठेवायला पाठवावं. पण तिने तो विचार दूर सारला. तिला आधीच उशीर झाला होता.
बऱ्याच वेळाने काशी परत आली. तिला प्रचंड वेदना होत होत्या. पण स्वस्तातल्या डॉक्टरकडे गर्भपात करणं म्हणजे जास्त दुखणारच असं तिने स्वतःला बजावलं. निदान आता आपण मोकळ्या झालो त्या मनोहरपासून असा विचार करत तिने नव्या जोमाने पावलं टाकायला सुरुवात केली.
आता कोणत्याही नव्या नात्याचं बंधन नाही... जबाबदारी नाही... ह्या एकटेपणामुळे आता कदाचित आपण आपल्या स्वतःचा, स्वार्थाचा विचार करु शकू.... मनोहर गेला, बाळही गेलं... बाळाने आपल्याला अजूनच अडकवून ठेवलं असतं इथे. त्या मनोहरच्या नादापायी इथून पळण्याच्या संधी आपण सोडून दिल्या, वाटत होतं तोच घेऊन जाईल इथून... पण आता नाही, आता साधं आयुष्य जगण्याचा नवा प्रयत्न करता येईल...
काशी त्या विचारांत पाय ओढत, धापा टाकत काशी कोठीपाशी पोचली. तिथे प्रचंड गर्दी जमली होती. काशी वाट काढत पुढे आली आणि तिचा आपल्या डोळ्यांवर विश्वासच बसेना.
रक्ताच्या थारोळ्यात मौसी निश्चल पडली होती. बाजूला दारूच्या बाटलीच्या काचा पडल्या होत्या.
"काशी! मौसी वरच्या मजल्यावरुन पडली.. कोणाला महितीच नव्हतं ती वर गेलीये. काशी!

काशी?" सरला पळत काशीपाशी आली पण काशीने बधीरपणे तिला दूर ढकललं.
"काशी नाही, अक्का म्हण आता तिला..!" मागून कमला आली. काशीला काहीच सुधरत नव्हतं. ती कशीबशी त्या गर्दीतून बाहेर पडली. चालत चालत गल्लीच्या टोकाला आली. आषाढाचे दिवस होते. वारकऱ्यांची गर्दी लोटली होती. एका तालात, ठेक्यात विठूनामाचा जप करत यात्रा पुढे चालली होती. काशी धडपडत, कण्हत खाली बसली. हातांनी ताल धरायचा वेडा प्रयत्न करायला लागली. लहानपणी आबा तिच्या लहानग्या हातांना धरून टाळ वाजवायचे. तिने आत्ता आपल्या हातांकडे पाहिलं. ते आता लहानपणीचे निष्पाप हात राहिले नव्हते. त्या हातांना आता तो ठेका पकडता येत नव्हता. काशीला काही कळेचना, ती जितका प्रयत्न करत होती ह्या धंद्याच्या मार्गातून दूर जाण्याचा तितकी जास्तच ती गुंतत चालली होती... म्हणजे हाच तिचा रस्ता होता का?
काशी कोठीवर आल्यापासून कितीतरी वेळा विचार करायची, आपण नाहिसे झाल्यावर आई-आबांनी काय केलं असेल? दुःखात परत फिरले असतील की यात्रा पूर्ण केली असेल? आज तिला कळून चुकलं. कितीही दुःख झालं तरी आई-आबा मागे फिरले नसणार. एकदा रस्ता ठरला की तो पूर्ण करावाच लागतो. कोणतीच यात्रा अर्धवट सोडता येत नाही.
हा साक्षात्कार होण्यासाठी त्या इवल्या बाळाचा जीव जायला हवाच होता का? काशीच्या डोळ्यांतून पाणी वाहू लागलं. ती वेड्यासारखी आपल्या पोटावरुन हात फिरवू लागली. कालपर्यंत जाणवणारी ती ऊब नाहिशी झाली होती. काशी हताशपणे पोटावर मारुन घ्यायला लागली. बऱ्याच वेळाने तिला धाप लागली आणि ती थांबली. जड मनाने उठली. पोटाला मार लागल्याने परत रक्तस्त्राव सुरु झाला होता. भिजलेलं लुगडं सावरत ती कोठीच्या दिशेने चालू लागली.
ती आता परत जाऊन अक्का होणार होती, धंदा चालवणार होती. हा रस्ता आता सोडता येणार नव्हता. ही यात्रा पूर्ण करावीच लागणार होती.

---